**महाराष्ट्र राज्यातील पोलीस प्रशिक्षण केंद्रांमधील विधी निदेशकांची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांकरीता प्रसारीत करण्यात आलेल्या माहितीपत्रकातील अटी व शर्तीमध्ये बदल करण्यात आल्याबाबतचे शुध्दीपत्रक**

**अटी व शर्ती:**

१. सदर पदाची नेमणूक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. या अधिकारी/कर्मचाऱ्याना शासकिय अधिकारी /कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

२. सदर नेमणुका या करार पध्दतीने प्रथम ११ महिन्यासाठी करण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि अशी मुदत वाढविताना एका वेळी ही मुदत ११ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्च: नियुक्ती करणे आवश्यक आहे असे, सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च: निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

३. उमेदवाराची निवड करतांना प्रथम ५० गुणांची लेखी परीक्षा व २५ गुणांची तोंडी परीक्षा घेण्यात येईल. लेखी व तोंडी परीक्षेत प्राप्त गुण एकत्रित करुन एकुण गुणानुक्रमानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची कंत्राटी पध्दतीने नेमणुकीसंबंधी कार्यवाही करण्यात येईल. तसेच, नियुक्ती देण्यासाठी कमीत कमी ६० टक्के गुण असणे आवश्यक राहील.

४. निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकिली व्यावसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्राधिकाऱ्याची लेखी परवानगीशिवाय करु शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा अर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. लेखी परीक्षेचा दिनांक व लेखी परीक्षेचे केंद्र ई-मेल द्वारे अवगत करण्यात येईल.

६. लेखी परीक्षा झाल्यानंतर उमेदवारांची निवड मुलाखतीद्वारे करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक व मुलाखत जया ठिकाणी होईल, त्याबाबतचे ठिकाण उमेदवारांना ई-मेल द्वारे कळविण्यात येईल.

७. उमेदवाराला कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

८. नियुक्त केलेल्या उमेदवारास दि.१५.९.२००६ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट ब नुसार करारनामा (Agreement) करणे अनिवार्य राहील.

९. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरीक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

१०. उमेदवारांनी वर विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी **अर्ज भरण्याच्या दिनांकास** पूर्ण करणे आवश्यक आहे.

११. अर्जासोबत पासपोर्ट आकाराचे (Passport Size Photo) सध्याचे काढलेले व स्वाक्षरी केलेले २ रंगीत फोटो जोडावेत.

Scanned with OKEN Scanner